# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411 018.

## करआकारणी व करसंकलन विभाग

| | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | सामान्य करात सूटीबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/5/कावि/184/2014, दिनांक - 15/05/2014 |
| विषय | 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर असलेल्या मिळकतीस सामान्य करात सवलत देणेबाबत |
| अंमलबजावणी कालावधी | धोरण अंमलात असेपर्यंत |
| कोणाच्या माहितीसाठी | प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी / गट प्रमुख |
| संदर्भ | 1. मा. महापालिका सभा ठराव क्रमांक 472, दिनांक 20/02/2014 |

**परिपत्रक**

मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक 472 दिनांक 20/02/2014 अन्वये 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर असलेल्या मिळकतीस सामान्य करात 50% सूटीबाबत धोरण ठरविले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश निर्गत करणेत येत आहेत.

1. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर असलेल्या एका मिळकतीस चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील मालमत्ता करातील सामान्य करात 50% सुट दिनांक 01/04/2014 पासून लागू राहील.
2. सदर सामान्य करातील सूटीचा लाभ संबंधित नि:समर्थ मिळकतधारक हयात असेपर्यंत अनुदेय राहील.
3. महानगरपालिका क्षेत्रातील संबंधित नि:समर्थ मिळकतधारकाचे एका मिळकतीस सदर सामान्य करातील सूट अनुदेय राहील.
4. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी संबंधित नि:समर्थ मिळकतधारकास दरवर्षी नगरसेवक यांचेकडील हयातीचा दाखला सादर करावा लागेल.
5. सदर सवलतीचा लाभ हा फक्त त्यांच्या एकाच मिळकतीस लागू असेल. तसेच संबंधितास रूपये 100/- चे स्टँप पेपरवर "अन्य कुठल्याही ठिकाणी मालमत्ता करात सवलत घेत नाही" असे प्रतिज्ञापत्र / हमीपत्र प्रथमत: सवलतीस पात्र ठरविणेचे वेळी फक्त एकदाच सादर करावे लागेल.
6. संबंधित नि:समर्थ मिळकतधारकांनी ससून / वाय.सी.एम.एच. यांचेकडील 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेबाबत प्रमाणपत्राची छायांकित सत्य प्रत महापालिकेकडे सादर करावी लागेल.
7. मिळकतधारकांनी सदर सूटीचा लाभ घेण्यासाठी मिळकतकराचे बिल मिळो अथवा न मिळो सरकारी वर्षाचे 30 जून पूर्वी सूटीची रक्कम वगळता थकबाकीसह संपूर्ण रक्कम भरणे अनिवार्य राहिल.
8. 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर असलेल्या एका मिळकतीस सामान्यकरात 50% सूट देणेबाबत सहाय्यक मंडलाधिकारी यांना अधिकार राहतील.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 411018.

प्रति,

1) प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी, --------------- विभागीय कार्यालय

प्रत : 1) मुख्य लेखापरिक्षण विभाग 2) लेखा विभाग 3) संगणक विभाग 4) प्रॉबिटी सॉफ्ट प्रा.लि.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी, पुणे - 411 018.
## करआकारणी व करसंकलन विभाग

दुरध्वनी क्रमांक : 020-67331504 020-67331506 67331545 फॅक्स क्रमांक : 27425600 E-mail : ptax@pcmcindia.gov.in Website :www.pcmcindia.gov.in

**जावक क्रमांक :** कर/मुख्य/5 /कावि/ 139 /2016 **दिनांक** : 02/04/2016

प्रति,
मा.उप आयुक्त,
करआकारणी व करसंकलन विभाग
पुणे महानगरपालिका, पुणे

**विषय – निराधार महिला अपंग महिलांचे नावे घर,विरचक्र,माजी सैनिक इत्यादीबाबत मिळकत करामध्ये देणते आलेल्या सवलतीची माहिती मिळणेबाबत.**

संदर्भ – आपले कडील पत्र क्रमांक दिनांक 19/03/2016 रोजीचे पत्र

महोदय,

विषयांकित संदर्भिय पत्रास अनुसरून कळविणेत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम 140-अ मध्ये मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरण्यातून सुट देणेबाबतची तरतुद आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतींना मिळकतधारकाने 30 जुन पुर्वी दोन्ही सहामाहीसह संपुर्ण बिलाची रक्कम भरल्यास मिळकतकरामध्ये खालिलप्रमाणे सवलतीच्या योजना अमलात आहे.

| | योजना | सवलत |
|---|---|---|
| 1 | माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे पत्नी यांचे स्वत: रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **50% रक्कम सूट** |
| 2 | फक्त महिलांचे नावे असलेल्या, स्वत: रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सुट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **50% रक्कम सूट** |
| 3 | 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर असणा-या मिळकतीस | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या **50% रक्कम सूट** |
| 4 | संपूर्ण मिळकतकराची रक्कम आगाऊ भरणा-यां करीता सामान्य करात सुट देणे | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>1. स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस **- 10% रक्कम सूट**<br>2. बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक /मोकळया जमिनी इ. मिळकतीस - **5% रक्कम सूट** |

| | | |
|---|---|---|
| 5 | **ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मिळकती**<br>**ग्रीहा :** ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी. पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटा पत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• **3 Star Rating - 05% रक्कम सूट**<br>• **4 Star Rating - 08% रक्कम सूट**<br>• **5 Star Rating - 10% रक्कम सूट** |
| | **स्वग्रीहा :** ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी. पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटा पत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• **1 Star Rating - 05% रक्कम सूट**<br>• **2 Star Rating - 08% रक्कम सूट**<br>• **3 Star Rating - 10% रक्कम सूट**<br>• **4 Star Rating - 12% रक्कम सूट**<br>• **5 Star Rating - 15% रक्कम सूट** |

सोबत अपंगाच्या मिळकतींना सवलत देणेबाबतचा महापालिका सभा ठराव व परिपत्राकाची छायांकित प्रत माहितीसाठी जोडली असे.

7/4/2018

**सहायक आयुक्त(करसंकलन)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 411018